# महिलाकरिता आरक्षण धोरण, पंचायत राज आणि ग्रामीण विकास

**अमर काशिनाथजी भोगे**
संशोधक,
राज्यशास्त्र विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर,

**प्रा. डॉ. शीला संजय खेडीकर**
मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभागप्रमुख
एम.व्ही, कॉमर्स जी.एम.टी.
आर्ट्स अ‍ॅन्ड जे.जे.पी. सायन्य कॉलेज, नागपूर

---

***सारांश :***

*महिला आरक्षणामुळे ग्रामीण समाजात स्थानिक पातळीवर नवी सत्ता केंद्रे निर्माण झाली. स्थानिक महिलांच्या नेतृत्वांच्या विकासाला अनुकूल वातावरण निर्माण झाले. ग्रामीण भागात महिलांना नवीन आव्हाने पेलण्याची संधी मिळाली आत्मविश्वास वाढला.आणि ग्रामीण विकासाला चलना मिळाली आहे.*

---

**प्रस्तावना :**

पंचायत राज व्यवस्थेचा परिचय भारतासाठी खूप जूना आहे. ही व्यवस्था फार प्राचीन काळापासून असल्याचे संदर्भ ऐतिहासिक दस्तऐवजातून व प्राचीन ग्रंथातून सापडतात. परकीयांच्या आक्रमणामुळे या संस्था मोडकळीस आल्या. इंग्रज राजवटीत मोडकळीस आलेल्या संस्था नष्ट केल्या. न्याय आणि सत्ता सरकारी अधिका-यांच्या हातात केंद्रित झाल्या. ग्रामीण व्यवसाय बंद पडले आणि लोकांचे लोंडे शहराकडे जाऊ लागले. स्वातंर्त्य चळवळीत महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला असे संबोधून ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली. त्यातून पंचायतराज व्यवस्थेत मुलभूत व व्यापक अर्थ प्राप्त झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर २ ऑक्टो ऑक्टोबर १९५७ रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी पंचायत राज व्यवस्थेचे रितसर उद्घाटन केले. तिथून ख-या अर्थाने पंचायत राज व्यवस्थेद्वारा ग्रामीण विकास योजना राबविण्यास सुरूवात झाली. पंचायत राज व्यवस्थेमध्ये लोकशाही विकेंद्रीकरण एक भाग असून लोकशाही व्यवस्था खोलवर रुजविण्यासाठी पंचायत राज व्यवस्था विस्तारीत होणे आणि अधिक मजबूत होणे आवश्यक असते. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत समाजातील प्रत्येक घटकांचा सहभाग अपेक्षित असतो म्हणूनच समाजाचा अत्यंत महत्वाचा घटक म्हणून महिलांचा सहभाग देखील महत्वाचा ठरतो. पण फक्त रचनात्मक फेर बदल करुन उद्दिष्टापर्यंत पोहचता येत नाही. त्यासाठी गुणात्मक, मुल्यात्मक परिवर्तन होणे आवश्यक असते. म्हणून ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्ती करुन महिलांसाठी पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थात १/३ जागा आरक्षित करण्यात आल्या हाच निर्णय मैलाचा दगड ठरला आणि राजकीय परिवर्तनाचा पाया ठरला.

**मूळ शब्द:** महिला आरक्षण, पंचायत राज, ग्रामीण विकास

**पंचायत राज :**

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी नुसार महाराष्ट्रात पंचायत राजव्यवस्था प्रत्यक्षात

आणण्यासाठी तत्कालीन महसुलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरणाची समिती जून १९६० ला स्थापित करण्या आली. या समितीने वेगाने काम करुन १५ मार्च १९६१ रोजी आपला अहवाल मांडला. या अहवालानुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९५९ करण्यात येऊन २४ मे ते १४ ऑगस्ट १९६१ अखेर जिल्हा पिरषदा व पंचायत समितीचा निवडणुकीचे काम पूर्ण झाले. १५ ऑगस्ट १९६१ पासुन लोप्रतिनिधी मार्फत या संस्थानचा कारभाराला सुरुवात झाली. त्यावेळी पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना कोणत्याही प्रकारचा वाव देण्यात आला नव्हता. महिलांचे कार्यक्षेत्र राजकारण नसुन केवळ चूल आणि मूल एवढ्या पुरतेच मर्यादित आहे. असा समज होता. त्यात महिलांनी आपली कर्तव्य क्षमता सिध्द करुन दाखविली तरी सुध्दा स्थानिक राजकारणात महिलांची दखल घेण्यात आली नव्हती.

बलवंतराय मेहता समितीने मात्र महिलांचा सहभाग देखील आवश्यक आहे हे ओळखून पंचायती संस्थावन दोन महिला सदस्य नियुक्त करण्याची शिफारस केली. त्यानुसार दोन महिलांची नियुक्ती केली जाऊ लागली परंतु स्थानिक प्रस्थापित पुरुष वर्ग आपल्या नातेसंबंधातील महिलांची नियुक्ती करु लागले. नियुक्ती झालेल्या महिला बैठकिला उपस्थित न राहता त्याच्या घरीच रजिस्टर पाठवून त्यांची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जात होता. त्यामुळे पंचायत संस्था मधील नेमणुकीद्वारे महिलांचा जो सहभाग होता. तो नाममात्र व परिणामशुन्य राहिला, सर्वसामान्य अनुसुचित जाती व जमातीतील महिला तर पंचायत राज संस्थाच्या कार्यालयात येण्याचे स्वातंर्त्य नव्हते. प्रत्यक्षात राजकीय सहभाग तर अशक्य प्राय गोष्टी होती.

**महिलाकरिता आरक्षण धोरण :**

स्थानिक राजकीय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा त्यांचा विकास व्हावा आणि राजकीय व सामाजिक, आर्थिक दृष्ट्या सक्षम व्हाव्यात या उद्देशाने पंचायत राज संस्थामध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतुद १९९३ मध्ये ७३ व्या घटनादुरुस्तीने करण्यात आली. या महिला आरक्षणामुळे हजारो वर्षाचा दुय्यम पातळीवरच्या जीवनानंतर पुरुषांच्या मानलेल्या राजकीय क्षेत्रात खर्या अर्थाने आज कुठे महिला पाऊल टाकायला लागल्या आहेत. त्यामुळे राजकीय क्षेत्रात वर्षानुवर्ष राजकारण करणार्या पुरुषांबरोबर त्यांची तुलना करणे योग्य होणार नाही. एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या कौटुंबिक जबाबदार्या सांभाळून राजकारण करावे लागणार आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की ३३ टक्के महिला आरक्षणामुळे महिलांच्या राजकिय सहभाग कधीही न थांबणार्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. आज संपूर्ण देशातील पंयायत राजसंस्थेत १० लाख महिला निवडून आल्या आहेत तर महाराष्ट्रातील ग्रामपंचायती मध्ये १ लाख महिला पंचायत राज व्यवस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण लागू केले आहे.

**ग्रामीण विकासाचा अर्थ :**

ग्रामीण विकासाच्या समस्येचे स्वरूप विविध आहे. आर्थिक व्यवसायाचा विकास, सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्टीकोनात बदल घडविणे आणि शिक्षण, आरोग्य सारख्या सामाजिक गरजांचा व सुविधांचा विकास करणे होय.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

महिला आरक्षणामुळे पंचायत राज संस्था मध्ये आज हजारो महिला लोक प्रतिनिधी म्हणून पदासीन आहे. परंतु त्यांच्या बाबत असे बोलले जाते की, महिला लोकप्रतिनिधी म्हणून फक्त रबरी स्टंप आहेत. प्रत्यक्ष कारभार त्यांचे नवरे किंवा इतर कुटुंबातील व्यक्ति पाहतात. त्या ग्रामसभेला किंवा तातडीच्या बैठकीला हजर नसतात. कदाचित त्या हजर असल्या तरी सभेत आपले मत मांडत नाहीत. त्यांच्यामध्ये निर्णय क्षमता नाही, त्यांच्यात आत्मविश्वास, नेतृत्वगुण नाहीत त्यांना राजकीय कामकाज जमत नाही. एकंदरीत महिला आरक्षण धोरण अयशस्वी झाले आहे का ? व त्यामुळे ग्रामीण विकासाला कराच चलना मिळाली आहे का ? त्याचे अध्ययन करून शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधामध्ये करण्यात आला आहे. प्रस्तुत विषयाच्या अध्ययन करण्याकरिता शोध अध्ययन क्षेत्र म्हणून वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्याची निवड केली आहे.

१ पंचायत राज व्यवस्थेतील महिला आरक्षणाचा ग्रामीण विकासावर झालेला परिणाम अभ्यासणे.
२ महिला नेतृत्वाखालील यशस्वी प्रकल्प आणि त्यांच्या अंमलबजावणीतील आव्हाने समजून घेणे.
३ महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने आरक्षण धोरणाची उपयुक्तता आणि मर्यादा विश्लेषित करणे.
४ महिलांच्या सहभागामुळे ग्रामीण समाजात झालेल्या सामाजिक आणि आर्थिक बदलांचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये:**

विषय अध्ययनाच्या अनुषंगाने गृहीतकृत्यांची मांडणी खालील प्रमाणे केली आहे.

१ महिला आरक्षणाने पंचायतराज संस्थामध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढून ग्रामीण विकासाला चलना मिळाली आहे.
२ ग्राम पातळीवरील सत्तेत महिलांचा राजकीय सहभाग परिणामकारक दिसत आहे.
३ महिला आरक्षण धोरण महिलांच्या सबलीकारणासाठी पोषक ठरले आहे.

**संशोधन पध्दती :**

अध्ययनाकरीता आर्वी तालुक्याची निवड केली असून २०१५ ते २०२० मध्ये झालेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकित निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधिना समग्र मानण्यात आले.

प्रस्तुत अध्ययनासाठी असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन विश्वनीय प्रामाणिक आणि प्रतिनिधिक स्वरुपाच्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेतील १०० महिला उत्तरदात्याची नमुना म्हणून निवड केली आहे. मुलाखत, अनुसुची व निरीक्षण पध्दतीचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला. त्यानुसार तथ्याचे वर्गीकरण सारणीकरण करुन विश्लेषण केले आहे.
सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासनिक स्थितीचे विश्लेषण

आर्वी तालुक्यातील पंचायत महिला प्रतिनिधींच्या मुलाखतींवर आधारित हे विश्लेषण त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासनिक स्थितीचे विश्लेषण करतो. यामध्ये महिलांच्या पंचायत राज

व्यवस्थेतील सहभाग, अडचणी आणि त्यांची कार्यक्षमता यांचा समावेश आहे.

**सामाजिक स्थिती :**

**शिक्षणाचा स्तर :**

७५ महिलांकडे किमान माध्यमिक शिक्षण आहे.
२० महिलांनी उच्च शिक्षण घेतले आहे.
५ महिला अशिक्षित असूनही नेतृत्व करत आहेत.

**कुटुंबाचा पाठिंबा :**

६० महिलांना कुटुंबाचा पाठिंबा आहे.
२५ महिलांना समाजातील पुरुषसत्ताक विचारांमुळे अडथळे येतात.
१५ महिला राजकीय निर्णय घेताना संकोच करतात.

**आर्थिक स्थिती :**

स्वतःचा व्यवसाय किंवा उत्पन्नाचे साधन
३० महिला शेती किंवा छोटे व्यवसाय करतात.
५० महिला घरकामावर अवलंबून आहेत.
२० महिला स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून उत्पन्न मिळवतात.

**सरकारी योजनांचा लाभ :**

४० महिलांना शासकीय योजना समजतात आणि त्यांचा उपयोग करतात.
३० महिलांना योजनांची माहिती अपुरी आहे.
३० महिलांना योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येतात

**राजकीय स्थिती आणि कार्यक्षमता :**

नेतृत्व आणि निर्णयक्षमता
५० महिला स्वबळावर निर्णय घेतात.
३० महिला पती किंवा कुटुंबाच्या मार्गदर्शनावर अवलंबून असतात.
२० महिला राजकीय दबावामुळे स्वातंत्र्याने निर्णय घेऊ शकत नाहीत.

**प्रशासनात सहभाग :**

७० महिला ग्रामसभांना उपस्थित राहतात.
४० महिला विकासकामांमध्ये सक्रिय असतात.

१० महिला केवळ नाममात्र पद भूषवतात.

**महिला आरक्षणामुळे महिला लोक प्रतिनिधीच्या स्थितीचे विश्लेषण :**

महिला लोक प्रतिनिधीच्या बाबतची स्थिती जाणून घेतली तर असे समोर आले की आरक्षण मिळाल्या नंतर १८ ते ४० या वयोगटातील महिला प्रतिनिधींची संख्या ४० टक्के आहे. तर आरक्षणानंतर अनसुचित जाती जमातीतील महिला प्रतिनिधींची संख्या २० टक्के तर इतर मागास गटातील महिला प्रतिनिधीची संख्या २० टक्के तर सर्वसाधारण गटातील महिला लोकप्रतिनिधीची संख्या २० टक्के आहे.

अनुसूचित जाती जमातीतील महिला प्रतिनिधीना काम करत असतांना सत्ताधारी किंवा वरचढ लोकांकडून अडथळे निर्माण करून त्रास देण्याचा हेतु असतो परंतु आता त्या न घाबरता परिस्थिला तोंड देतात.असे मुलाखती मध्ये महिला व्यक्त झाल्या. यावरुन असे दिसून येते की, राजकीय सत्ता आपण मिळवून चालऊ शकतो हा आत्मविश्वास या महिला प्रतिनिधिमध्ये निर्माण झालेला दिसून आला. आरक्षण मिळाल्या बरोबर सुशिक्षित महिला लोक प्रतिनिधीची संख्येमध्ये वाढ झालेली दिसून येते. एकूण उत्तर दात्यामध्ये १० वी, १२ वी शिकलेल्या एकूण महिला प्रतिनिधींची संख्या ६५ टक्के आहे. अशा महिला प्रतिनिधी प्रत्यक्ष ठराव वाचल्याशिवाय सही करत नाही असे सांगितले. यावरुन स्पष्ट होते की राजकीय सत्ता आपल्यासाठी नाही ही भिती त्यांच्या मधून दूर होत आहे. आपण सत्ता राबवु शकतो निर्णय प्रक्रियेत सक्रिय भुमिका बजावू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये वाढलेला दिसून आला.

पंचायत राज व्यवस्थेत निवडुण येणाऱ्या महिला बहुतांशी राजकीय पार्श्वभुमी असलेल्या कुटुंबातीलच असतात असा समज आहे. आरक्षणानंतर हा समज खोटा ठरत आहे. कौटुंबिक पार्श्वभुमी असलेल्या महिला प्रतिनिधींची संख्या ग्रामपंचायतीत ५५ टक्के पंचायत समितीत ३५ टक्के तर जिल्हा परिषदेत १५ टक्के आहे. महिला राजकारणात कोणत्या कारणांनी आल्यात हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्या आरक्षणामुळेच आम्हाला संधी मिळाली असे सांगणार्या महिला प्रतिनिधीचे प्रमाण ग्रामपंचायतीत ८०.४० टक्के तर पंचायत समिती व जिल्हा परिषदेत ९९ टक्के आहे. यावरुन स्पष्ट होते की, स्थानिक सत्तेत महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात आरक्षणामुळे संधी मिळाली. त्यामुळे आम्ही ग्रामीण विकासाचा भाग झालो आहोत असे सांगितले.

**निष्कर्ष आणि शिफारसी :**

१ महिलांचे पंचायत राज व्यवस्थेतील योगदान वाढत आहे, पण त्यांना अधिक प्रशिक्षण आणि पाठिंबा आवश्यक आहे.

२ स्थानिक प्रशासनाने महिलांसाठी नेतृत्व प्रशिक्षण आणि डिजिटल साक्षरता कार्यक्रम राबवावेत.

३ महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सूक्ष्म वित्तीय मदत आणि व्यवसाय प्रशिक्षण द्यावे

४ समाजातील पुरुषप्रधान मानसिकतेत बदल घडवण्यासाठी जनजागृती करावी.

५ राजकीय सहभाग वाढलारू महिलांनी ग्रामसभांमध्ये महत्त्वाचे मुद्दे मांडून निर्णय प्रक्रियेत सहभाग घेतला आहे.

६ सामाजिक सुधारणारू दारूबंदी, बालविवाह रोखणे, आणि स्वच्छता मोहिमा यासारख्या उपक्रमांमध्ये महिलांनी पुढाकार घेतला आहे.

७ ग्रामीण विकासाला चालनारू महिला नेतृत्वाखाली आरोग्य, शिक्षण, आणि पायाभूत सुविधा सुधारल्या गेल्या आहेत.

**संदर्भग्रंथ :**


- भारती पाटील - पंचायती राज संस्था मधील स्त्रीयांचा सहभाग प्रबोधन प्रकाशन ज्योती, जुलै २००१
- व्हि. बी. पाटील - महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी संस्थानिक स्वराज्य संस्था, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१९
- ग. शा. पंडीत- पंचायत राज आणि ग्रामीण महिला सुगावा प्रकाशन पुणे दृ २००६
- व्होरा राजेंद्र- स्त्रीयांचा राजकरणातील सहभाग स्त्री न्याय कायदा संपादक जया सांगडे कसबा पेठ, पुणे
- भारताचे शासन आणि राजकारण, डॉ. भा.ल. भोळे, पिंपळापुरे व के. नागपुर
- पंचायत राज, डॉ. भा. पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
- भारतीय शासन आणि राजकारण, डॉ. अलका देशमुख, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर
- स्त्री आणि राजकारण, डॉ. प्रशांत अमृतकर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
- https://mt.vikaspedia.in
- https://www.mpsskido.com
- https://vishwakosh.marathi.gov.in , https://idd.maharashtra.gov.in